| CNR No.MHKO190006922022 | | | | |
|---|---|---|---|---|
| | दाखल तारीख | १८/०८/२०२२ | | |
| | नोंदणी तारीख | २०/०८/२०२२ | | |
| | निकाल तारीख | ०७/०५/२०२६ | | |
| | कालावधी | वर्ष | महिने | दिवस |
| | | ०३ | ०८ | २० |

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, राधानगरी, जि.कोल्हापूर यांचे न्यायालयात**

(पीठासीन अधिकारी आर. डि. शिंदे)

**न्यायनिर्णय घोषीत दिनांक – ०७/०५/२०२६**

**(संक्षिप्त फौजदारी खटला क्र.२०२/२०२२)** **(नि.क्र.१५/ब)**

गुन्हा नोंद क्र.११७/२०२२, राज्य उत्पादन शुल्क, राधानगरी, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| अभियोगपक्ष | :- | **महाराष्ट्र शासन,**<br>निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क, राधानगरी |
| अभियोग पक्षातर्फे | :- | विषेश सरकारी वकील श्री. के. एम. भोसले |
| आरोपी | :- | **दत्तात्रय रंगराव पोवार**<br>वय वर्ष – ३८, व्यवसायः मजुरी<br>रा.खिंडी व्हरवडे, ता.राधानगरी, जि. कोल्हापूर |
| आरोपीतर्फे विधीज्ञ | :- | ॲड.श्री.यु.एम.मानकर |

**भाग–ब**

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये)

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :- | १४/०७/२०२२ |
| फिर्याद दाखल दिनांक | :- | १४/०७/२०२२ |

| | | |
|---|---|---|
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | :– | १८/०८/२०२२ |
| दोषारोप निश्चित केल्याचे दिनांक | :– | ०२/०७/२०२३ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | :– | १३/१०/२०२५ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | :– | ०७/०५/२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | :– | ०७/०५/२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | :– | निरंक. आरोपीस निर्दोषमुक्त करण्यात येते. |

## आरोपीची माहिती

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याची दिनांक | गुन्ह्याचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये समायोजित (Set Off) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | दत्तात्रय रंगराव पोवार | नाही | १४/०७/२०२२ | महाराष्ट्र दारु बंदी अधिनियम कलम ६५(ई) प्रमाणे. | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

## – न्या य नि र्ण य –

## (पारीत दिनांक ०७/०५/२०२६)

महाराष्ट्र दारु बंदी अधिनियम,१९४९ चे कलम ६५(ई) अन्वये आरोपीवर संपरीक्षा चालविण्यात येत आहे.

**अभियोग पक्षाची हकीकत खालीलप्रमाणे :–**

२. दिनांक १४/०७/२०२२ रोजी प्रथम खबर देणार श्री. एस. एन. पाटील, जवान, राज्य उत्पादन शुल्क, राधानगरी, जि.कोल्हापूर यांना प्राप्त झालेल्या गुप्त बातमी

नुसार दोन पंच व त्यांचे सहकर्मचारी यांचेसह खिंडी व्हरवडे, ता. राधानगरी या ठिकाणी जावुन अचानक छापा टाकला. त्यावेळी तेथे आरोपी आपल्या कब्जामध्ये एका कापडी पिशवीमध्ये देशी दारु जी.एम डॉक्टरच्या १८० मि.ली च्या २५ सिलबंद बाटल्या व पाच काचेचे ग्लास असा अंदाजे रु.१८४०/– किंमतीचा प्रतिबंधीत मुद्देमाल जवळ बाळगलेल्या स्थितीत मिळुन आला. सदर मुद्देमालाची पंचाकडून खात्री करुन तो जप्ती पंचनाम्याद्वारे जप्त केला. जप्त मुद्देमालामधुन त्यांनी रासायनीक पृथक्करणासाठी १८० मि.ली. च्या दोन बाटल्यांमध्ये नमुने घेवुन तो सिलबंद केला. तसेच आरोपीला सदर गुन्हयात समजपत्र दिले. त्यानंतर घटनेबाबत राज्य उत्पादन शुल्क, राधानगरी, कोल्हापूर यांचेकडे प्रथम खबर दाखल केली.

३. सदर प्रथम खबर वरुन दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, राधानगरी यांचेकडे आरोपी विरूद्ध गुन्हा क्र.११७/२०२२ महाराष्ट्र मद्यनिषेध चे कलम ६५(ई) प्रमाणे नोंदविला. त्यानंतर तपासअधिकारी यांनी तपास पुर्ण करुन न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले.

४. माझे पुर्वाधिकारी यांनी आरोपीचे महाराष्ट्र मद्यनिषेध चे कलम ६५(ई) अन्वये नि.क्र.७ प्रमाणे निवेदन नोंदविले व आरोपीस त्याचे विरुद्ध असलेल्या गुन्हयाचा तपशिल समजावून सांगितला. आरोपीने गुन्हा कबुल नसल्याचे कथन केले व खटला चालविण्याची मागणी केली.

५. अभियोग पक्षाने आरोपी विरुद्धचा गुन्हा शाबित करण्यासाठी प्रथम खबर देणार शिवाजी नामदेव पाटील (अ.सा.क्र.१) यांची साक्ष नि.क्र.१० कडे व पंच साक्षीदार प्रकाश पांडूरंग चव्हाण (अ.सा.क्र.२) यांची साक्ष नि.क्र.१२ कडे नोंदविली आहे.

अभियोगपक्षाने नि.क्र.१३ कडे पुरसीस दाखल करुन त्यांचा पुरावा बंद केला. अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांच्या साक्षीपुराव्यात आरोपीविरुध्द आरोपसदृश्य कथने आल्यामुळे आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३ प्रमाणे निवेदन नि.क्र.१४ कडे नोंदविण्यात आले. आरोपीने त्याच्या निवेदनामध्ये त्याच्या विरुध्द प्रस्तुतची खोटी केस दाखल केली आहे असा बचाव घेतला आहे.

६. अभियोगपक्षातर्फे विशेष सरकारी वकील व आरोपीचे विद्वान वकिल यांचा युक्तीवाद ऐकला.

७. प्रस्तुत प्रकरणात खाली नमुद विचाराधीन प्रश्न माझे विचारासाठी पुढे आलेले आहेत. त्यावरील माझे निष्कर्ष मी खाली नमुद कारणमिमांसेसह देत आहे.

| **अ.क्र.** | **विचाराधीन प्रश्न** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | दिनांक १४/०७/२०२२ रोजी खिंडी व्हरवडे, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर येथे आरोपी हा आपल्या कब्जामध्ये १८० मिलीच्या २५ सिलबंद बाटल्या व पाच काचेचे ग्लास असा प्रतिबंधीत मुद्देमाल विक्री करण्याच्या उद्देशाने विनापरवाना जवळ बाळगताना मिळुन आला, हे अभियोगपक्षाने सिध्द केले काय? | नकारार्थी. |
| २. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## **– का र ण मि मां सा –**

**विचाराधीन प्रश्न क्र.१ बाबत**:–

८. अभियोगपक्षाने प्रस्तुत प्रकरणातील घटनास्थळ पंच प्रकाश पांडूरंग चव्हाण (अ.सा.क्र.२) यांची साक्षतपासणी नोंदविली. परंतु सदर साक्षीदाराने अभियोगपक्षास कोणतेही सहकार्य केलेले नाही. त्यामुळे परवानगीनंतर विशेष सरकारी वकील यांनी सदर साक्षीदारास उत्तर सुचक प्रश्न विचारले. परंतु त्यामधुन देखील अभियोगपक्ष आरोपी विरुध्द कोणताही पुरावा अभिलेखावर आणू शकला नाही.

९. प्रथम खबर देणार (अ.सा.क्र.१) यांच्या पुराव्यातुन फिर्याद नि.क्र. PW-1/P-1 व जप्त मुद्देमालातील नमुने रासायनीक विश्लेषणाकरीता ज्या पत्रान्वये प्रयोगशाळेत पाठविले ते पत्र नि.क्र. PW-1/P-2 अशी कागदपत्रे शाबीत केली आहेत. सदर साक्षीदारने त्याच्या पुराव्यामध्ये आरोपी त्याच्या कब्जामध्ये डॉक्टर जी.एम च्या १८० मि.ली च्या २५ बाटल्या हा प्रतिबंधीत मुद्देमाल बेकायदेशीरपणे व विनापरवाना विक्री करत असताना मिळून आला असे कथन केले आहे.

१०. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या प्रथम खबर देणार (अ.सा.क्र.१) याच्या उलटतपासामध्ये त्याने हे मान्य केले आहे की, प्रस्तुत प्रकरणात त्यांचा वाहक म्हणुन जबाब नोंदविलेला नाही. तसेच त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, या प्रकरणात जप्त मुद्देमाल तपासणीसाठी साधारण २८ दिवसांनी ते स्वतः घेवुन गेले होते. पुढे त्यांनी हे मान्य केले की, गुन्हयातील जप्त मुद्देमाल व दुसरी सॅम्पल बॉटल न्यायालयासमोर हजर केलेले नाहीत, घटनास्थळी दारु पिणारे ग्राहक मिळाले नव्हते, घटनास्थळ ही रिकामी जागा होती, तसेच त्या ठिकाणी कोणीही ये–जा करु शकत होते. साक्षीदाराच्या

उलटतपासातील वर नमुद कथनांवरुन आरोपी हा घटनास्थळी बेकायदेशीरपणे दारुची विक्री करत होता ही बाब शाबीत होत नाही. तसेच सदर साक्षीदार हा राज्यउत्पादन शुल्क कार्यालयातील शासकीय कर्मचारी तसेच प्रस्तुत प्रकरणातील प्रथम खबर देणार असून तो स्वतंत्र असा साक्षीदार नाही. तसेच अभियोगपक्षाने सदर साक्षीदाराच्या कथनांना बळकटी देण्याकरीता इतर कोणातही स्वतंत्र असा साक्षीदार तपासलेला नाही. त्यामुळे प्रस्तुत साक्षीदाराची साक्ष अभियोगपक्षास उपयुक्त ठरत नाही.

११. अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेले प्रकाश (अ.सा.क्र.२) हा प्रस्तुत प्रकरणातील जप्ती व घटनास्थळ पंच साक्षीदार आहे. परंतु सदर साक्षीदाराने अभियोगपक्षास कोणतेही सहकार्य केलेले नाही. प्रस्तुत प्रकरणात अभियोगपक्षाने रासायनिक विश्लेषण अहवाल दाखल केलेला आहे. परंतु असे असले तरी सदरचा रासायनिक विश्लेषण अहवाल अभियोगपक्षातर्फे शाबीत करण्यात आला नाही. अभियोपक्षातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांच्या साक्षी पुराव्यातुन देखील आरोपी कडुन जप्त केलेला मुद्देमाल हा प्रतिबंधीत दारुच होती ही बाब शाबीत होत नाही. त्यामुळे घटनेच्या वेळी आरोपी आपल्या कब्जामध्ये देशी दारु डॉक्टर जी. एम च्या १८० मिली च्या २५ सिलबंद बाटल्या असा प्रतिबंधीत मुद्देमाल बेकायदेशीर विक्री करण्याच्या उद्देशाने जवळ बाळगताना मिळून आला ही बाब पुराव्याअभावी शाबीत होत नाही. परिणामी, मी विचाराधीन प्रश्न क्र.१ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>विचाराधीन प्रश्न क्र.२ बाबत</u>:–**

१२. वर नमुद सर्व चर्चा व विचाराधीन प्रश्न क्र.१ चे निष्कर्ष विचारात घेता, आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## – आ दे श –

१. आरोपी दत्तात्रय रंगराव पोवार याला महाराष्ट्र मद्यनिषेध अधिनियम मधील कलम ६५(ई) या शिक्षापात्र गुन्हयाच्या आरोपातून फौजदारी प्रक्रिया संहीता कलम २५५(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. आरोपीचा वैयक्तीक जात मुचलका व जामीनकदबा रद्द करण्यात येत आहे.

३. सदर गुन्हयातील जप्त मुद्देमाल देशी दारु डॉक्टर जी.एम च्या १८० मिली च्या २५ सिलबंद बाटल्या, एक कापडी पिशवी व पाच काचेचे ग्लास हा मुद्देमाल अपील कालावधीनंतर विहीत तरतुदीनुसार नाश करण्यात यावा.

४. आरोपीला असे निर्देश देण्यात येतात की, फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७–अ ची पुर्तता करण्यासाठी त्याने रु.१५,०००/– चे बंधपत्र व जामिनपत्र आजपासुन सात दिवसांच्या कालावधीत सादर करावे.

***(सदर न्यायनिवाडा खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)***

RAJENDRA DHANAJI SHINDE
Digitally signed by RAJENDRA DHANAJI SHINDE
Date: 2026.05.07 16:36:23 +0530

ठिकाण : राधानगरी

दिनांक :०७/०५/२०२६

**(आर. डि. शिंदे)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी
राधानगरी

## भाग–क

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii) अन्वये)

**सरकार पक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार**

**१) अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयीन साक्षीदारांची यादी–**

**अ. अभियोग पक्ष साक्षीदारांची यादी**

| सा.क्र. | साक्षीदाराचे नांव | स्वरुप | निशाणी क्र. |
|---|---|---|---|
| १. | शिवाजी नामदेव पाटील | प्रथम खबर देणार | १० |
| २. | प्रकाश पांडूरंग चव्हाण | जप्ती व घटनास्थळ पंच | १२ |

**ब. बचाव पक्ष साक्षीदारांची यादी– निरंक**

**क. न्यायालयीन साक्षीदारांची यादी– निरंक**

**२) अभियोग पक्ष/ बचाव पक्ष/ न्यायालयामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा) –**

**अ. अभियोग पक्ष निशाणी–निरंक**

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | PW–1/P–1 | फिर्यादी जबाब |
| २. | PW–1/P–2 | पत्र |
| ३. | १३ | अभियोगपक्षातर्फे पुरावा संपलेची पुसीस |

**ब. बचाव पक्ष निशाणी– निरंक**

**क. न्यायालयातर्फे निशाणी–**

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | १ | दोषारोपपत्र |
| २. | ७ | आरोपीचे निवेदन |
| ३. | १३ | अभियोगपक्षातर्फे पुरावा संपलेची पुसीस |
| ४. | १४ | आरोपीचे फौ.प्र.सं.कलम ३१३ प्रमाणे निवेदन. |

**ड. सामग्री वस्तू –** देशी दारु डॉक्टर जी. एम च्या १८० मिली च्या २५ सिलबंद बाटल्या, एक कापडी पिशवी व पाच काचेचे ग्लास.